Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune S.R.No 832-A, Final Plot No. 178,179, Near e-Balbharti, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune 411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९, ई बालभारती शेजारी आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे भांबुर्डा शिवाजीनगर पुणे ४११००४



Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्रमांक रा.मं./परीक्षा-८/ २२२२
पुणे - ४११ ००४
दिनांक -२५/०५/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

विषय -- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षा जून-जुलै २०२६ अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याच्या तारखांबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, जून-जुलै २०२६ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि.२५/०५/२०२६ रोजी संपुष्टात येणार आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची विलंब शुल्काची निर्धारित मुदत संपल्यानंतर अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व इतर तपशीलवार माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अतिविलंब शुल्क मुदत (रू.५०/- प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क मुदत (रू.१००/-प्रतिदिनी,प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|
| मंगळवार दि. २६/०५/२०२६ ते मंगळवार दि. ०२/०६/२०२६ | बुधवार दि. ०३/०६/२०२६ ते मंगळवार दि. ०९/०६/२०२६ |

१.सदर आवेदनपत्रे माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पद्धतीने (www.mahahsscboard.in) या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र online भरलेल्या विद्यार्थ्याचे अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्क online चलन तयार करून चलनावर नमुद ICICI बँकेच्या Virtul Acount मध्ये कोणत्याही बँकेद्वारे त्याच दिवशी online पद्धतीने जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application Status मध्ये Send to board व Payment Status मध्ये Paid असा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी. असे Status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राहय धरण्यात येतील. विभागीय मंडळाने अशी आवेदनपत्रे व

Scanned with OKEN Scanner

चलने स्विकारून व त्याचे Status ची खात्री करून पुढील कार्यवाही करावी. माध्यमिक शाळांनी चलन उशीरा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबधित विलंबाची यथायोग्य फी संबधित माध्यमिक शाळांकडून घेण्यात यावी.

२.त्याचप्रमाणे आवेदनपत्रामध्ये नाव/जन्मतारीख/विषय/माध्यम याबाबत Prilist च्या दुरूस्त्या राहिलेल्या असल्यास प्रचलित , पद्धतीने (Offline) विहित शुल्कासह जमा करुन घेणेबाबत माध्यमिक शाळांना सूचित करण्यात यावे.

३.प्रचलित पद्धतीप्रमाणे विशेष अतिविलंबासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबधित माध्यमिक शाळाप्रमुखांना पाठविण्यात यावे. तसेच पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलिंब/विशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत. दि. ०९/०६/२०२६ नंतर कोणत्याही विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे स्विकारू नयेत.

४. मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्यांचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्याकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब माध्यमिक शाळांमार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी. कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/ 1844
कोल्हापूर -४१६००४
दिनांक:- 26 MAY 2026

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय:- इ.10 वी पुरवणी परीक्षा जून-जुलै 2026 अतिविलंब/विशेष अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखांबाबत.

उपरोक्त प्रकटनाची नोंद घेऊन त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(अनुराधा म्हेत्रे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

प्रत माहितीसाठी:
शिक्षणाधिकारी,(माध्यमिक)
सातारा, सांगली व कोल्हापूर.

Scanned with OKEN Scanner